# २०१८ चा एकरूप परिनियम क्रमांक २

(प्रकाशन दिनांक - १० ऑक्टोबर २०१८)

## संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, याच्या वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती

संदर्भ - म.सा.वि.अ. २०१६ - कलम २३चे पोटकलम (२) खंड (ख)

# UNIFORM STATUTE NO. 2. OF 2018

(Publication Date - 10 October 2018)

## Emoluments, Tenure and Terms and Conditions of Service of the Director of National Service Scheme

Ref - M.P.U.A. - 2016 - Section 23(2) (b)

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १३० (४)] बुधवार, ऑक्टोबर १०, २०१८/आश्विन १८, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ३६१

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १० ऑक्टोबर २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक परिनि. २०१८/प्र.क्र.८६/विशि-२.— महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम २३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (क) तसेच कलम ७२ च्या पोट-कलम (१०) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, याच्या वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती यांच्याशी संबंधित पुढीलप्रमाणे एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

**२०१८ चा एकरूप परिनियम क्रमांक २**

१. **संक्षिप्त नाव.**— या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, याच्या वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती ) एकरूप परिनियम, २०१८, असे म्हणावे.

२. **नामनिर्देशन प्रक्रिया.**— कुलगुरू, पात्र इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवील आणि त्यांच्यामधून एका योग्य व्यक्तीला, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून तीन वर्षांच्या पदावधीकरिता, जो आणखी एका मुदतीसाठी नवीकृत करता येईल-नामनिर्देशित करील .

या बाबत मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यता प्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ सदर पदावर प्रतिनियुक्त झालेल्या व्यक्तिच्या जागी दुसऱ्या व्यक्तिची नेमणूक त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या निकषानुसार करू शकेल.

३. **वित्तलब्धी.**— संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून नामनिर्देशित केलेली व्यक्ती, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून तिचे नामनिर्देशन केल्याच्या दिनांकास तिच्या पूर्वीच्या सेवेत असताना तिला जितकी वित्तलब्धी व वेतनमान मिळत असेल तितकी वित्तलब्धी व वेतनमान मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ या कडून मिळण्यास हक्कदार असेल.

४. **वय.**— संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, या पदाच्या नामनिर्देशनासाठी इच्छुक असलेल्या उमेदवाराचे वय हे नामनिर्देशनाच्या वेळेस ५० वर्षांपेक्षा जास्त असणार नाही.

**५. सेवेच्या अटी व शर्ती.**— (१) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, याच्या सेवेच्या अटी व शर्ती ह्या, त्याच्या मूळ पदाच्या अटी व शर्तींप्रमाणेच असतील आणि संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून त्याच्या पदावधीदरम्यान त्याला अहितकारक होईल अशा प्रकारे त्या बदलता येणार नाहीत.

(२) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून नामनिर्देशन झाल्यावर, त्याच्या मूळ कायम पदावर त्याने घेतलेले अंतिम वेतन संरक्षित केले जाईल.

(३) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीचा, नामनिर्देशनापूर्वी तिने धारण केलेल्या कायम पदावर धारणाधिकार असेल आणि त्या पदाच्या सेवेच्या अटी व शर्तींनुसार ती तिच्या मूळ पदावरून सेवानिवृत्त झाल्याप्रमाणे असेल.

(४) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, हा थेट कुलगुरूंच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली काम करील.

(५) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, यास, कुलगुरूला उद्देशून, एक महिन्याची नोटीस देऊन, आपल्या पदाचा लेखी स्वरुपात त्याच्या स्वाक्षरीने राजीनामा देता येईल आणि कुलगुरूने त्याचा राजीनामा स्वीकारल्यावर किंवा उक्त नोटिशीचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून, यांपैकी जे अगोदर घडेल तेव्हापासून, त्याचे आपले पद धारण करण्याचे बंद होईल.

(६) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, यास, कुलगुरूकडून एक महिन्याची लेखी नोटीस देऊन त्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सिद्धार्थ खरात,**
शासनाचे सहसचिव.